दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ
बीड महाराष्ट्र | शनिवार, 15 ऑगस्ट 2026 | अंक क्र. 98 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4
Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com



# वैद्यनाथाच्या भूमीत विकासाची नवी गाथा !
# परळीला मिळतेय नवी ओळख!






## "पंकजाताईंच्या दूरदृष्टीतून परळीच्या विकासाला नवी झेप वैद्यनाथाच्या भूमीत साकारतेय पशुसंवर्धनाचे 'पॉवर सेंटर'!"

### लोकनेत्याच्या संस्कारातून वैद्यनाथाच्या भूमीत निर्माण होणार पशुसंवर्धनाची नवी गाथा!

### ५६४ कोटींच्या पशुवैद्यकीय महाविद्यालयातून पशुसंवर्धनाचे 'पॉवर सेंटर' साकारतेय!

### ऊर्जा नगरीची नवी ओळख पशुसंवर्धनाच्या नकाशावर

### ४१ हेक्टर क्षेत्रात उभे राहणार भव्य संकुल!

परळी - नितीन ढाकणे

परळीच्या विकासात्मक जडणघडणीच्या इतिहासात आणखी एक मोठे पान लिहिले जात आहे. ज्योतिर्लिंग वैद्यनाथाची धार्मिक नगरी, ऊर्जा नगरी अशी ओळख असलेल्या परळीला आता पशुवैद्यकीय शिक्षण, संशोधन, उपचार आणि आधुनिक पशुसंवर्धनाचे महत्त्वपूर्ण केंद्र म्हणून नवी ओळख मिळणार आहे. परळीची लेक राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या दूरदृष्टीतून परळी येथे भव्य पशुवैद्यकीय पदवी महाविद्यालय संकुल उभारणीच्या दिशेने आज पायाभरणीचे निर्णायक पाऊल पडत आहे. हा एक इतिहास ठरणार आहे. हा केवळ एक कॉलेज प्रकल्प नाही; तर शेतकरी, पशुपालक, विद्यार्थी आणि संपूर्ण पशुसंवर्धन क्षेत्राच्या भविष्यात बदल घडविणारी मोठी पायाभूत गुंतवणूक ठरणार आहे.५६४ कोटींच्या या प्रकल्पाची भूमिपूजनाची ही कोनशिला परळीच्या विकासातील नवी झेप ठरणार आहे.

परळीची लेक राज्याची पशुसंवर्धन मंत्री झाल्याबरोबर एक मोठं आणि पिढ्यान् पिढ्या लक्षात राहील असं गिफ्ट परळीकरांना मिळालं. राज्य मंत्रिमंडळाने २५ फेब्रुवारी २०२५ रोजी परळीत नवीन पशुवैद्यकीय पदवी महाविद्यालय स्थापन करण्यास मान्यता दिली. या प्रकल्पासाठी सुमारे ५६४.५८ कोटींच्या खर्चास मान्यता देण्यात आली.पंकजाताई मुंडे यांनी पशुसंवर्धन विभागाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर परळीला आणि बारामतीला हे महत्त्वाचे संस्थात्मक केंद्र मिळाले. आपल्या परळीला मोठे प्रकल्प आणण्याची राजकीय इच्छाशक्ती आणि प्रशासनाला त्यासाठी कामाला लावण्याची क्षमता या दोन्हींचा परिणाम म्हणून या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाची मुहूर्तमेढ रोवली गेली.

### ४१ हेक्टर क्षेत्रात उभे राहणार भव्य संकुल!

**या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी परळी तालुक्यातील मौजे लोणी येथील गट क्र. ०७ मधील ८ हेक्टर ८० आर व मौजे परळी येथील स.नं. ४७८ मधील २० हेक्टर आणि अतिरिक्त १३ हेक्टर अशी एकूण ४१ हेक्टर ८० आर जमीन नवीन पशुवैद्यकीय महाविद्यालय आणि पशुधन प्रक्षेत्र उभारणीसाठी प्रदान करण्यात आली आहे. परळीतील जमीन महाविद्यालयीन संकुलासाठी, तर लोणी येथील जमीन पशुधन प्रक्षेत्रासाठी वापरण्याचे नियोजन आहे. म्हणजेच विद्यार्थ्यांना केवळ चार भिंतींच्या वर्गात पशुवैद्यकीय शिक्षण मिळणार नाही; तर प्रत्यक्ष पशुधन, पशुपालन, प्रजनन, पोषण आणि व्यवस्थापनाचा अनुभव घेता येणार आहे.**

### भविष्यात शेकडो पशुचिकित्सा तज्ज्ञ तयार होणार

प्रस्तावित महाविद्यालयात विद्यार्थ्यांना पशुवैद्यकीय पदवी शिक्षणाची संधी मिळणार आहे.आज पशुधन क्षेत्रात तज्ज्ञ पशुवैद्यकीय डॉक्टरांची मोठी गरज आहे. या पार्श्वभूमीवर परळीतील महाविद्यालयातून दरवर्षी प्रशिक्षित पशुवैद्यकीय मनुष्यबळ तयार होणार आहे. बीडसह संपूर्ण मराठवाड्याच्या पशुधन अर्थव्यवस्थेला याचा दीर्घकालीन फायदा होऊ शकतो.आज शेतकऱ्याच्या अर्थकारणात पशुधनाचा वाटा मोठा आहे. पण पशुधन आजारी पडले, तर अनेकदा योग्य वेळी तज्ज्ञ उपचार मिळणे हीच मोठी अडचण ठरते.याचं वास्तवाला उत्तर देणारे केंद्र परळीत आकाराला येणार आहे. हे एका पिढीचे शिक्षण नव्हे; पुढच्या अनेक पिढ्यांच्या पशुधन अर्थव्यवस्थेला बळ देणारी गुंतवणूक ठरणार आहे.

## ऐतिहासिक झेप

## रोजगाराच्या नव संधी

### एकाच संकुलात संपूर्ण साखळी

**हे केवळ अध्यापनाचे केंद्र न राहता उपचार आणि निदान सुविधांनी युक्त पशुवैद्यकीय केंद्र म्हणून विकसित होणार आहे.मोठ्या व लहान जनावरांसाठी उपचार सुविधा, शस्त्रक्रिया, प्रयोगशाळा, क्ष-किरणासारख्या निदान सुविधा, औषध व्यवस्था आणि आवश्यक तांत्रिक मनुष्यबळामुळे परिसरातील पशुपालकांना आधुनिक पशुवैद्यकीय सेवा मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. शेतकऱ्याच्या गोठ्यातील जनावरापासून विद्यार्थ्यांच्या प्रयोगशाळेपर्यंत— एकाच संकुलात संपूर्ण साखळी यामाध्यमातून निर्माण होणार आहे.**

### संशोधनाला मोठी संधी

**पशुरोगांचे निदान, प्रतिबंध, पशुपोषण, प्रजनन, पशुवंशशास्त्र, पशुधन उत्पादन आणि आधुनिक पशुपालन यासारख्या विषयांमध्ये प्रयोगशाळा व संशोधनाच्या सुविधा विकसित होणार आहेत. यामुळे परळीतील हे केंद्र भविष्यात पशुधनाशी संबंधित संशोधन आणि तांत्रिक ज्ञानाचे महत्त्वाचे केंद्र बनण्याची क्षमता ठेवणारे होणार आहे.शिक्षण ,उपचार ,संशोधन, पशुधन प्रक्षेत्र ,आधुनिक तंत्रज्ञान ,शेतकरी मार्गदर्शन असे हे एकात्मिक पशुसंवर्धन केंद्र निर्माण होणार आहे.**

### रोजगाराच्या नव्या संधी

**या महाविद्यालया साठी मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळाची तरतूद करण्यात आली आहे. ९६ शिक्षक, १०४ नियमित शिक्षकेतर कर्मचारी, ७६ बाह्यस्रोत असे २७६ मनुष्यबळ लागणार आहे. यामध्ये प्राध्यापकांपासून सहाय्यक प्राध्यापकांपर्यंत, पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांपासून प्रयोगशाळा व क्ष-किरण तंत्रज्ञांपर्यंत तसेच पशुधन प्रक्षेत्रातील कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. म्हणजेच महाविद्यालय सुरू झाल्यानंतर शिक्षणाबरोबरच स्थानिक अर्थव्यवस्थेलाही चालना मिळणार आहे.**

### परळीच्या नकाशावर आणखी एक 'मोठे केंद्र'

**परळीची ओळख वैद्यनाथ ज्योतिर्लिंगामुळे देशभर आहे. औष्णिक वीज प्रकल्पामुळे ऊर्जा क्षेत्रातही परळीचे महत्त्व आहे. आता त्यात पशुवैद्यकीय शिक्षण आणि पशुसंवर्धनाचे नवे केंद्र जोडले जाणार आहे. ४१ हेक्टरचा परिसर, कोट्यवधींची गुंतवणूक, पशुधन प्रक्षेत्र, प्रयोगशाळा, उपचार सुविधा आणि २७६ मनुष्यबळाची तरतूद हे चित्र केवळ एका महाविद्यालयाचे नाही. हे परळीच्या बदलत्या विकासाचे चित्र आहे.**

### परळीच्या भविष्यातील नवा अध्याय

**परळीला मोठ्या शैक्षणिक संस्था आणि आधुनिक सुविधा मिळाव्यात, या दिशेने सुरू असलेल्या प्रयत्नांना पशुवैद्यकीय महाविद्यालयामुळे एक मोठे यश मिळाले आहे.पंकजाताई मुंडे यांच्या दूरदृष्टीतून परळीच्या भूमीत उभे राहणारे हे पशुवैद्यकीय संकुल भविष्यात हजारो पशुपालकांना सेवा, शेकडो विद्यार्थ्यांना शिक्षण आणि पशुसंवर्धन क्षेत्राला तज्ज्ञ मनुष्यबळ देणारे केंद्र ठरणार आहे. या निमित्ताने आज परळीच्या मातीत एक नवे स्वप्न आकार घेत आहे.**

### पशुपालकांसाठी ज्ञानाचे 'वन-स्टॉप सेंटर'

**दुग्ध व्यवसाय, शेळी-मेंढीपालन, कुक्कुटपालन किंवा इतर पशुपालन करणाऱ्या शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान, रोगप्रतिबंधक उपाय, पशुपोषण, प्रजनन आणि पशुधन व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन मिळू शकते. पशुधन निरोगी तर शेतकऱ्याची अर्थव्यवस्था मजबूत या सूत्राला प्रत्यक्ष बळ देणारी सुविधा म्हणून या प्रकल्पाकडे पाहिले जात आहे.पशुसंवर्धन विभागाची जबाबदारी सांभाळताना पंकजाताई मुंडे यांनी मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता विकास योजना, पशुधन विमा योजना, पशुपालकांसाठी विविध योजना आणि परळीत पशुवैद्यकीय महाविद्यालय अशा माध्यमातून पशुसंवर्धन क्षेत्राला संस्थात्मक बळ देण्यावर भर दिला आहे. परळीतील हा प्रकल्प त्यांच्या कार्यकाळातील दृश्यमान आणि दीर्घकालीन परिणाम करणाऱ्या प्रकल्पांपैकी एक ठरणार आहे.**



# ऑस्ट्रेलिया पहिल्या डावात 198 धावांवर सर्वबाद : स्मिथने 71 धावा केल्या, हसन महमूदला 6 बळी

■ डार्विन वृत्तसंस्था

**डार्विनमध्ये खेळल्या जात असलेल्या पहिल्या कसोटीच्या पहिल्या दिवशी ऑस्ट्रेलियाचा पहिला डाव 198 धावांवर आटोपला. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करणाऱ्या ऑस्ट्रेलियन संघाची लंच ब्रेकपर्यंत 4 गडी गमावून 74 धावा अशी बिकट अवस्था होती. यानंतर स्टीव्ह स्मिथने डाव सावरला, पण तो बाद झाल्यानंतर ऑस्ट्रेलियाचे शेवटचे चार गडीही लवकर बाद झाले.**



## स्मिथ-कॅरीने 55 धावा जोडल्या

■ स्मिथ ऑस्ट्रेलियाकडून सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरला. त्याने 109 चेंडूंमध्ये 71 धावांची खेळी केली, ज्यात 7 चौकार आणि 1 षटकार समाविष्ट होता. स्मिथ आणि अ‍ॅलेक्स कॅरी यांच्यात पाचव्या विकेटसाठी 55 धावांची भागीदारी झाली, जी डावातील सर्वात मोठी भागीदारी ठरली. कॅरी 19 धावांवर बाद झाला.

## 74 धावांवर ऑस्ट्रेलियाचे 4 बळी पडले

■ ऑस्ट्रेलियाची सुरुवात चांगली झाली होती, पण पहिल्या सत्रात बांगलादेशच्या वेगवान गोलंदाजांनी सलग बळी घेऊन यजमान संघावर दबाव आणला. ऑस्ट्रेलियाला पहिला धक्का वेगवान गोलंदाज हसन महमूदने दिला. त्याने जॅक वेदराल्ड (23) ला बाद करून बांगलादेशला पहिले यश मिळवून दिले. यानंतर, त्याच्या पुढच्याच षटकात हसन महमूदने ट्रॅव्हिस हेडलाही पॅव्हेलियनमध्ये पाठवले. मार्नस लाबुशेन फक्त 1 धाव काढून पॅव्हेलियनमध्ये परतला. कॅमेरॉन ग्रीनलाही फक्त 13 धावा करता आल्या. लंचपर्यंत ऑस्ट्रेलियाने 74 धावांवर 4 बळी गमावले होते.

## दुसऱ्या सत्रात ऑस्ट्रेलियाने 4 बळी गमावले

■ यानंतर स्टीव्ह स्मिथने अ‍ॅलेक्स कॅरीसोबत मिळून डाव सावरण्याचा प्रयत्न केला. दोघांमध्ये पाचव्या विकेटसाठी 55 धावांची भागीदारी झाली. कॅरी 19 धावा काढून एबादत हुसेनच्या गोलंदाजीवर बोल्ड झाला. त्यानंतर ब्यू वेबस्टर 12 आणि कर्णधार पॅट कमिन्स 9 धावा काढून बाद झाले. मिचेल स्टार्कलाही केवळ 1 धाव करता आली. स्मिथने आपले अर्धशतक पूर्ण केले. दुसरे सेशन संपेपर्यंत तो 99 चेंडूंमध्ये 69 धावा काढून नाबाद आहे, ज्यात 7 चौकार आणि 1 षटकार समाविष्ट आहे. नॅथन लायन 3 चेंडूंमध्ये एकही धाव न काढता क्रीजवर आहे.

## हसन महमूदने 6 बळी घेतले

■ बांगलादेशच्या वतीने हसन महमूद सर्वात यशस्वी गोलंदाज ठरला. त्याने 17 षटकांत 55 धावा देऊन 6 बळी घेतले. तस्किन अहमद आणि एबादत हुसेन यांना प्रत्येकी 2-2 बळी मिळाले. हसनने ट्रॅव्हिस हेड, जेक वेदराल्ड, स्टीव्ह स्मिथ, पॅट कमिन्स, मिचेल स्टार्क आणि नॅथन लायन यांना आपले शिकार बनवले.

# क्रीडा मंत्रालयाने टेबल टेनिस फेडरेशन निलंबित केले :व्यवस्थापनातील त्रुटींचा हवाला ; भारतीय ऑलिंपिक संघाची समिती देखरेख करेल

■ दिल्ली वृत्तसंस्था

भारतीय क्रीडा मंत्रालयाने टेबल टेनिस फेडरेशन ऑफ इंडिया (TTFI) ला निलंबित केले. बुधवारी मंत्रालयाने फेडरेशनमधील व्यवस्थापन आणि प्रशासकीय व्यवस्थेशी संबंधित त्रुटी हे याचे कारण सांगितले. मंत्रालयाने भारतीय ऑलिंपिक संघटना (IOA) ला देशभरातील टेबल टेनिसचे प्रशासन सांभाळण्यासाठी एक समिती स्थापन करण्याचे निर्देश दिले आहेत. ही समिती TTFI मध्ये प्रशासकीय व्यवस्था पूर्ववत होईपर्यंत फेडरेशनच्या कामकाजावर देखरेख करेल. मंत्रालयाने भारतीय ऑलिंपिक संघटनेला समिती स्थापन करण्याचे निर्देश दिले आहेत. मंत्रालयाने भारतीय ऑलिंपिक संघटनेला समिती स्थापन करण्याचे निर्देश दिले आहेत.

### वेळेवर निवडणुका न घेतल्याने कारवाई

मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, TTFI ची मान्यता निलंबित करण्यामागचे एक मोठे कारण म्हणजे निर्धारित वेळेत फेडरेशनच्या निवडणुका न घेणे हे आहे. या प्रकरणी मंत्रालयाने TTFI ला यापूर्वी कारणे दाखवा नोटीस बजावली होती. फेडरेशनने नोटीसला उत्तर देताना आपली बाजू मांडली होती. मात्र, मंत्रालयाला हे उत्तर असमाधानकारक वाटले. त्यानंतर TTFI ची मान्यता निलंबित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

### यापूर्वीही फेडरेशन निलंबित झाले होते

फेब्रुवारी 2022 मध्ये दिल्ली उच्च न्यायालयाने फेडरेशनच्या कार्यकारी समितीला निलंबित केले होते. ही कारवाई स्टार खेळाडू मनिका बत्रा यांच्या याचिकेनंतर करण्यात आली होती. त्यांनी निवड धोरणाबद्दल प्रश्न उपस्थित केले होते. फेडरेशनचे कामकाज सांभाळण्यासाठी न्यायालयाने एका प्रशासकाची नियुक्ती केली होती. मात्र, निवडणुकांनंतर डिसेंबर 2022 मध्ये निलंबन मागे घेण्यात आले.



## खेळाडूंच्या नोंदणीवर परिणाम

■ फेडरेशन निलंबित झाल्यामुळे खेळाडूंना आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये खेळणे कठीण होऊ शकते. तथापि, भारतीय ऑलिंपिक संघ (IOA) द्वारे स्थापन केलेल्या अ‍ॅड-हॉक समितीचा मुख्य उद्देश खेळाचे प्रशासन सुरळीत ठेवणे आहे जेणेकरून खेळाडूंचा सहभाग प्रभावित होऊ नये. तरीही, आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता आणि स्पर्धांमध्ये भाग घेण्यासाठी आंतरराष्ट्रीय संस्थांशी (जसे की ITTF) समन्वय साधणे आवश्यक आहे. मान्यता निलंबित झाल्यानंतर फेडरेशनला मिळणारा सरकारी निधी थांबवला जाऊ शकतो, कारण निधी केवळ मान्यताप्राप्त संस्थांनाच मिळतो.

## क्रीडा मंत्रालयाचे अधिकार आणि शक्ती

■ क्रीडा मंत्रालयाला राष्ट्रीय क्रीडा महासंघांना मान्यता देण्याचा आणि ती परत घेण्याचा किंवा निलंबित करण्याचा अधिकार आहे. हा अधिकार मंत्रालयाला तेव्हा मिळतो जेव्हा एखाद्या फेडरेशनच्या अंतर्गत कामकाजात गंभीर अनियमितता, गैरव्यवस्थापन किंवा प्रशासनाशी संबंधित त्रुटी आढळतात.

# फगाणिस्तानने आयर्लंडला 42 धावांनी हरवले



■ अफगाणिस्तान वृत्तसंस्था

अफगाणिस्तानने बुधवारी बेलफास्टमध्ये आयर्लंडवर 42 धावांनी विजय मिळवला. संघाने 5 सामन्यांच्या मालिकेत 3-0 अशी अजिंक्य आघाडी घेतली. मालिकेतील शेवटचा सामना 15 ऑगस्ट रोजी बेलफास्टमध्येच खेळला जाईल. अफगाणिस्तानने प्रथम फलंदाजी करताना 9 गडी गमावून 343 धावा केल्या. सेदिकुल्लाह अटलने 143 आणि इब्राहिम जादरानने 107 धावा केल्या. प्रत्युत्तरात आयर्लंडचा संघ 48 षटकांत 301 धावांवर सर्वबाद झाला. अँडी बालबर्नीने 109 आणि कर्टिस कॅम्फरने 84 धावा केल्या. अफगाणिस्तानकडून यामीन अहमदझाईने 4 बळी आणि राशिद खानने 3 बळी घेतले. आयर्लंडच्या मॅकडोनफने 3 आणि गेविन होईने 2 बळी घेतले. अटलला सामनावीर म्हणून निवडण्यात आले.

### गुरबाज लवकर बाद, अटल-जादरानने डाव सांभाळला

अफगाणिस्तानला सुरुवातीलाच धक्का बसला. मागील सामन्यातील टॉप स्कोरर रहमानुल्लाह गुरबाज दुसऱ्या षटकात बाद झाला. यानंतर अटल आणि जादरानने दुसऱ्या विकेटसाठी 231 धावांची भागीदारी करून डाव सावरला. वनडेमध्ये अफगाणिस्तानसाठी या विकेटची ही सर्वात मोठी भागीदारी आहे. दोघांनी 16 वर्षांपूर्वीचा विक्रम मोडला. हा विक्रम करीम सादिक आणि मोहम्मद शहजाद यांच्या नावावर होता, ज्यांनी स्कॉटलंडविरुद्ध 218 धावांची भागीदारी केली होती. अटलने आपल्या 25व्या वाढदिवशी शतक झळकावले. त्याने डावाच्या मधल्या षटकांमध्ये हुशारीने फलंदाजी केली आणि जेव्हा जेव्हा डाव मंदावू लागला, विशेषतः फिरकी गोलंदाजीविरुद्ध चौकार मारून पुन्हा गती वाढवली. अटलने सलग चौकार मारून गोलंदाजांवर दबाव कायम ठेवला. तो 150 धावांच्या जवळ पोहोचताना दिसत होता, पण लॉंग ऑनवर चुकीच्या टायमिंगच्या फटक्यावर तो बाद झाला. जादराननेही अटलला पूर्ण साथ दिली. त्याने एकदिवसीय कारकिर्दीतील 7वे शतक झळकावले. जादरानच्या खेळीत 11 चौकार आणि एक षटकार समाविष्ट होता.

### आयर्लंडची सुरुवात संथ राहिली

मोठ्या लक्ष्याचा पाठलाग करताना आयर्लंडने संथ सुरुवात केली. सुरुवातीच्या पहिल्या 8 षटकांत संघ केवळ 25 धावा करू शकला. यामीन अहमदझाई आणि अजमतुल्ला उमरझाई यांनी सुरुवातीच्या स्पेलमध्ये स्विंग गोलंदाजीने आयरिश सलामीवीरांना त्रास दिला. पॉल स्टर्लिंग सतत चेंडू चुकवत राहिला, तर बालबर्नीने सावध फलंदाजी केली.

### कॅम्फरने 46 चेंडूंमध्ये 84 धावा केल्या

सामना हातातून निसटल्यानंतर कर्टिस कॅम्फरने टी-20 शैलीत फलंदाजी केली. त्याने 46 चेंडूंवर 84 धावा केल्या, ज्यात 8 चौकार आणि 5 षटकार समाविष्ट होते. कॅम्फरने सरळ बॅटने जोरदार फटके मारून धावा केल्या. तो 48व्या षटकात आयर्लंडचा नववा फलंदाज म्हणून बाद झाला. त्याच्या खेळीमुळे आयर्लंड 300 धावांच्या पुढे जाऊ शकला.



# सॅम करन दर्जेदार अष्टपैलू ; फाफ लिलावात परत येण्याची शक्यता वर्तवली

■ जोहान्सबर्ग वृत्तसंस्था

दक्षिण आफ्रिकेच्या टी-20 लीग SA20 च्या पाचव्या हंगामापूर्वी, माजी अष्टपैलू खेळाडू ख्रिस मॉरिसने लीग, खेळाडू आणि फ्रँचायझींबद्दल चर्चा केली. मीडिया डेवर मॉरिस म्हणाले की, आयपीएल फ्रँचायझींच्या गुंतवणुकीने SA20 ला आर्थिक बळकटी देण्यासोबतच जागतिक ओळख मिळवून देण्यात मोठी भूमिका बजावली आहे.

जोहान्सबर्ग सुपर किंग्स (JSK) मधून फाफ डु प्लेसिसला रिलीज केल्याबद्दल त्यांनी आश्चर्य व्यक्त केले. मॉरिस म्हणाले की, फाफकडे अजूनही संघाला देण्यासाठी बरेच काही आहे. तथापि, नवीन प्रशिक्षक आल्यानंतर फ्रँचायझीला भविष्यासाठी संघ तयार करण्याची गरज देखील आहे. मॉरिस यांना आशा आहे की JSK लिलावात फाफला पुन्हा संघात समाविष्ट करू शकते. त्यांनी सॅम करनलाही एक दर्जेदार अष्टपैलू खेळाडू म्हटले.

### आयपीएल फ्रँचायझींचा फायदा मिळाला

मॉरिस यांनी SA20 च्या यशात आयपीएल फ्रँचायझींच्या गुंतवणुकीला अत्यंत महत्त्वाचे मानले. ते म्हणाले की, आयपीएल हा जगातील एक मोठा क्रिकेट ब्रँड आहे आणि त्याच्या



फ्रँचायझी दक्षिण आफ्रिकेच्या लीगमध्ये आल्याने SA20 ला आर्थिक बळकटी मिळाली आहे. सीझन-5 मधील मोठ्या नावांमध्ये मिचेल मार्शबद्दलही मॉरिस उत्सुक आहेत. ते म्हणाले की, ऑस्ट्रेलियाई अष्टपैलू खेळाडू आपल्या बॅट, चेंडू आणि कर्णधारपदाने सनरायझर्स ईस्टर्न केपवर मोठा प्रभाव टाकू शकतात. मिचेल मार्श दक्षिण आफ्रिका टी-२० लीगमध्ये सनरायझर्स ईस्टर्न केप संघाकडून खेळतात. मिचेल मार्श दक्षिण आफ्रिका टी-२० लीगमध्ये सनरायझर्स ईस्टर्न केप संघाकडून खेळतात.

### सॅम करन सर्वोत्तम अष्टपैलू

सॅम करन एमआय केपटाऊनमधून डरबन सुपर जायंट्समध्ये गेल्यावर मॉरिसने त्याचे कौतुक केले. त्याने करनला दर्जेदार अष्टपैलू म्हटले. मॉरिसच्या मते, करन फलंदाजीमध्ये वेगवेगळ्या क्रमांकावर खेळू शकतो. तो नवीन चेंडूसह डेथ ओव्हर्समध्येही गोलंदाजी करण्याची क्षमता ठेवतो. भारताचा माजी फलंदाज अजिंक्य रहाणे SA20 मध्ये खेळण्याची शक्यता असल्याबद्दल मॉरिस म्हणाला की तो कोणत्याही संघासाठी एक उत्कृष्ट पर्याय असू शकतो. त्यांनी रहाणेच्या अनुभवाची आणि शांत स्वभावाची प्रशंसा केली. मॉरिस म्हणाले की रहाणे भारतासाठी दीर्घकाळ खेळले आहेत आणि आयपीएलमध्ये कर्णधारपदही भूषवले आहे. ते युवा खेळाडूंना खूप काही शिकवू शकतात. अजिंक्य रहाणे आयपीएल संघ कोलकाता नाइट रायडर्सचे कर्णधार होते. त्यांनी याच वर्षी 30 जुलै रोजी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली. अजिंक्य रहाणे आयपीएल संघ कोलकाता नाइट रायडर्सचे कर्णधार होते. त्यांनी याच वर्षी 30 जुलै रोजी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली. एमआय केपटाऊनबद्दल मॉरिस म्हणाले की, संघाकडे आधीपासूनच मजबूत कोर आहे. सुरुवातीच्या प्लेइंग-11 मधील सुमारे 9 खेळाडू संघात कायम आहेत. काही खेळाडूंना रिलीज करूनही संघाची गुणवत्ता कमी झालेली नाही. मॉरिसने ही शक्यताही व्यक्त केली की एमआय केपटाऊन गरज पडल्यास फाफ डु प्लेसिसला संघात समाविष्ट करण्याचा विचार करू शकते. याचे कारण असे की फाफ आता केपटाऊनमध्ये स्थानिक खेळाडू आहे आणि त्याच्याकडे खूप अनुभव आहे.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# भारतीय स्वातंत्र्य आणि संविधानिक मूल्ये : डॉ. राजेंद्र बगाटे

**१५ ऑगस्ट हा प्रत्येक भारतीयाच्या मनात राष्ट्राभिमान, कृतज्ञता आणि जबाबदारीची भावना जागविणारा अत्यंत महत्त्वाचा दिवस आहे. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताने ब्रिटिशांच्या दीर्घकालीन वसाहतवादी राजवटीतून स्वातंत्र्य प्राप्त केले आणि एका स्वतंत्र राष्ट्राच्या नव्या पर्वाला प्रारंभ झाला. या दिवसाचे महत्त्व केवळ ध्वजारोहण, राष्ट्रगीत, देशभक्तिपर गीते आणि विविध कार्यक्रमांपुरते मर्यादित नाही. भारतीय स्वातंत्र्याच्या मागे अनेक पिढ्यांचा संघर्ष, असंख्य ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांचे बलिदान आणि कोट्यवधी भारतीयांच्या स्वराज्याच्या आकांक्षेची प्रेरणा आहे. त्यामुळे स्वातंत्र्यदिन हा इतिहासाचे स्मरण करण्याचा दिवस तर आहेच; पण त्याचबरोबर स्वातंत्र्याचा अर्थ समजून घेण्याचा, संविधानिक मूल्यांचे महत्त्व जाणून घेण्याचा आणि स्वतंत्र भारताच्या भविष्यासाठी आपली जबाबदारी निश्चित करण्याचा दिवस आहे.**



भारताला मिळालेले स्वातंत्र्य सहजासहजी प्राप्त झालेले नव्हते. ब्रिटिश सत्तेच्या काळात भारतीयांना अनेक प्रकारच्या शोषणाला सामोरे जावे लागले. या परिस्थितीत परकीय सत्तेविरुद्ध असंतोष वाढत गेला. स्वराज्य आणि स्वाभिमानाची भावना भारतीय समाजात दृढ होत गेली. १८५७ चा उठाव हा ब्रिटिश सत्तेविरुद्धच्या संघर्षातील महत्त्वाचा टप्पा ठरला.

पुढील काळात भारतीय राष्ट्रीय चळवळीला संघटित स्वरूप प्राप्त झाले. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेनंतर भारतीयांच्या राजकीय हक्कांसाठी संघर्ष केला. स्वदेशी आणि बहिष्काराच्या चळवळीने भारतीयांमध्ये आत्मनिर्भरतेची भावना निर्माण केली. या काळात सामाजिक सुधारणांच्या चळवळीनेही राष्ट्रनिर्मितीला महत्त्वपूर्ण आधार दिला. महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी शिक्षण, स्त्रीमुक्ती आणि सामाजिक समतेसाठी केलेले कार्य भारतीय समाजाच्या परिवर्तनाचा महत्त्वाचा टप्पा ठरले. राजर्षी शाहू महाराजांनी सामाजिक न्याय आणि शिक्षणासाठी केलेले कार्य तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समानता आणि मानवी प्रतिष्ठेसाठी केलेला संघर्ष यामुळे स्वातंत्र्याची संकल्पना केवळ परकीय सत्तेपासून मुक्तीपुरती राहिली नाही, तर सामाजिक न्यायाशीही जोडली गेली.

महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्यलढ्याला व्यापक जनआंदोलनाचे स्वरूप प्राप्त झाले. सत्य, अहिंसा आणि सत्याग्रहाच्या माध्यमातून गांधीजींनी सामान्य नागरिकांना स्वातंत्र्याच्या संघर्षात सहभागी करून घेतले. असहकार आंदोलन, मिठाचा सत्याग्रह आणि भारत छोडो आंदोलन या विविध टप्प्यांतून ब्रिटिश सत्तेला भारतीय जनतेच्या सामूहिक शक्तीची जाणीव झाभारतीय स्वातंत्र्यलढ्यात क्रांतिकारकांचे योगदानही अविस्मरणीय आहे. भगतसिंग, राजगुरू, सुखदेव, चंद्रशेखर आझाद आणि असंख्य क्रांतिकारकांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणांची आहुती दिली. नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी आझाद हिंद सेनेच्या माध्यमातून ब्रिटिश सत्तेला आव्हान दिले. महिलांनीही या संघर्षात मोठ्या धैर्याने सहभाग घेतला. त्यामुळे भारतीय स्वातंत्र्याची गाथा ही संपूर्ण समाजाच्या सामूहिक संघर्षाची गाथा आहे.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला; परंतु स्वातंत्र्याबरोबर फाळणीची शोकांतिका देशाच्या वाट्याला आली. भारत आणि पाकिस्तान अशी विभागणी झाली आणि मोठ्या प्रमाणावर हिंसाचार व विस्थापन झाले. स्वातंत्र्याचा आनंद आणि फाळणीचे दुःख या दोन्हींच्या छायेत स्वतंत्र भारताचा जन्म झाला. त्यामुळे स्वातंत्र्यदिन हा आनंदाचा दिवस असला तरी तो राष्ट्रीय एकात्मता, बंधुता आणि सामाजिक सलोखा जपण्याची जबाबदारीही आपल्याला स्मरवून देतो.

स्वातंत्र्यानंतर भारतासमोर राष्ट्रनिर्मितीची मोठी आव्हाने होती. गरिबी, अशिक्षितता, बेरोजगारी, आरोग्याच्या समस्या आणि आर्थिक मागासलेपण यांवर मात करणे आवश्यक होते. या परिस्थितीत भारताने लोकशाहीचा मार्ग स्वीकारला. २६ जानेवारी १९५० रोजी भारतीय संविधान लागू झाले आणि भारत प्रजासत्ताक बनला. संविधान हे स्वतंत्र भारताच्या राष्ट्रजीवनाचे मूलभूत अधिष्ठान ठरले. संविधानाच्या उद्देशिकेत न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांना केंद्रस्थानी ठेवण्यात आले आहे. ही मूल्ये केवळ संविधानातील शब्द नाहीत; ती भारतीय लोकशाहीच्या यशाची मूलभूत तत्त्वे आहेत.

'न्याय' हे संविधानिक मूल्य भारतीय राष्ट्रनिर्मितीचे महत्त्वाचे ध्येय आहे. सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्यायाशिवाय स्वातंत्र्याला पूर्ण अर्थ प्राप्त होत नाही. समाजातील दुर्बल, वंचित आणि उपेक्षित घटकांना समान संधी उपलब्ध करून देणे, भेदभाव दूर करणे आणि प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जगण्याची संधी देणे ही न्यायाची खरी कसोटी आहे. स्वातंत्र्यानंतर भारताने कायदे आणि धोरणांच्या माध्यमातून सामाजिक न्यायाच्या दिशेने अनेक पावले उचलली आहेत. मात्र सामाजिक विषमता पूर्णपणे नाहीशी करण्यासाठी संविधानिक मूल्यांचे आचरण समाजाच्या प्रत्येक स्तरावर होणे आवश्यक आहे.

'स्वातंत्र्य' हे भारतीय संविधानाचे आणखी एक महत्त्वाचे मूल्य आहे. विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा आणि उपासना यांचे स्वातंत्र्य नागरिकांना देण्यात आले आहे. परंतु स्वातंत्र्याचा अर्थ मनमानी नव्हे. आपल्या स्वातंत्र्याचा वापर करताना इतरांच्या अधिकारांचा आणि प्रतिष्ठेचा आदर करणे आवश्यक आहे. आजच्या सामाजिक माध्यमांच्या युगात अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा प्रश्न अधिक महत्त्वाचा झाला आहे. खोटी माहिती, अफवा, द्वेषपूर्ण संदेश आणि समाजात तेढ निर्माण करणारा मजकूर यामुळे लोकशाही आणि सामाजिक सलोख्याला धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे स्वातंत्र्यासोबत विवेक आणि जबाबदारी आवश्यक आहे.

'समता' हे संविधानिक मूल्य भारतीय समाजासाठी विशेष महत्त्वाचे आहे. जात, धर्म, लिंग किंवा इतर कोणत्याही आधारावर भेदभाव होऊ नये, ही संविधानाची स्पष्ट भूमिका आहे. भारतीय समाजाच्या इतिहासात जातीय विषमता आणि सामाजिक भेदभावाची मोठी परंपरा राहिली आहे. त्यामुळे संविधानाने कायदेशीर समानतेबरोबर सामाजिक न्यायालाही महत्त्व दिले. आज कायद्याच्या दृष्टीने समानता प्रस्थापित झाली असली तरी सामाजिक व्यवहारात समानता पूर्णपणे रुजविण्याचे काम अद्याप बाकी आहे. स्त्री-पुरुष समानता, जातीय भेदभावाचा अंत आणि वंचित घटकांना समान संधी यांसाठी समाजाची मानसिकता बदलणे आवश्यक आहे.

'बंधुता' हे भारतीय संविधानातील अत्यंत सुंदर आणि आवश्यक मूल्य आहे. भारताची विविधता ही त्याची मोठी ताकद आहे. अनेक भाषा, धर्म, जाती, पंथ आणि संस्कृती असूनही भारतीय समाज एका राष्ट्रीय भावनेने जोडलेला आहे. ही एकता टिकविण्यासाठी परस्पर आदर, सहिष्णुता आणि मानवी प्रतिष्ठेची जाणीव आवश्यक आहे. मतभेद असणे हे लोकशाहीचे लक्षण आहे; मात्र मतभेदांचे रूपांतर वैरात होऊ नये. दुसऱ्याच्या मताचा आदर करणे, विविधतेचा स्वीकार करणे आणि सामाजिक सलोखा जपणे ही बंधुतेची खरी भावना आहे.

भारतीय लोकशाहीचे यश हे संविधानिक मूल्यांच्या प्रत्यक्ष आचरणावर अवलंबून आहे. लोकशाही म्हणजे केवळ निवडणूक आणि मतदान नव्हे. नागरिकांचा सहभाग, प्रश्न विचारण्याचा अधिकार, सत्तेवर नियंत्रण, कायद्याचे राज्य आणि विरोधी मतांचा आदर हे लोकशाहीचे महत्त्वाचे घटक आहेत. मतदानाचा अधिकार हा लोकशाहीचा आधार असला तरी सुजाणपणे मतदान करणे ही नागरिकांची जबाबदारी आहे. जात, धर्म, पैसा किंवा क्षणिक भावनांपेक्षा सार्वजनिक हिताचा विचार करून मतदान करणारा नागरिक लोकशाही अधिक मजबूत करतो.

संविधानाने नागरिकांना मूलभूत अधिकार दिले असले तरी मूलभूत कर्तव्यांचीही जाणीव करून दिली आहे. संविधानाचा आदर करणे, राष्ट्रीय एकता आणि अखंडता जपणे, पर्यावरणाचे संरक्षण करणे, वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे, सार्वजनिक संपत्तीचे रक्षण करणे आणि उत्कृष्टतेसाठी प्रयत्न करणे ही नागरिकांची कर्तव्ये आहेत. आज स्वातंत्र्यदिन साजरा करताना अधिकारांसोबत कर्तव्यांचे स्मरण करणे अत्यंत आवश्यक आहे. अधिकारांचा आग्रह धरणाऱ्या नागरिकांनी आपल्या कर्तव्यांपासून दूर राहणे ही लोकशाहीसाठी योग्य बाब नाही. शिक्षण हे संविधानिक मूल्ये रुजविण्याचे सर्वात प्रभावी माध्यम आहे. शिक्षणामुळे व्यक्तीला आपल्या अधिकारांची जाणीव होते, विवेक विकसित होतो आणि सामाजिक प्रश्नांकडे चिकित्सक दृष्टीने पाहण्याची क्षमता प्राप्त होते. शाळा आणि महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना केवळ परीक्षेसाठी तयार न करता संविधान, लोकशाही, समानता, बंधुता आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांचे संस्कार दिले पाहिजेत. प्रश्न विचारणारा, विचार करणारा, विविध मतांचा आदर करणारा आणि सामाजिक जबाबदारी स्वीकारणारा विद्यार्थी हा भविष्यातील सक्षम नागरिक ठरतो. आजच्या भारतात युवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. स्वातंत्र्यलढ्यातील युवकांनी देशासाठी बलिदान दिले. आजच्या युवकांनी ज्ञान, कौशल्य, विज्ञान, तंत्रज्ञान, उद्योजकता आणि सामाजिक कार्याच्या माध्यमातून देशाच्या विकासात योगदान द्यावे. कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल तंत्रज्ञान, अंतराळ संशोधन आणि नवउद्योजकता यांसारख्या क्षेत्रांत युवकांसमोर मोठ्या संधी आहेत. मात्र तंत्रज्ञानासोबत विवेक, नैतिकता आणि सामाजिक संवेदनशीलता असणेही आवश्यक आहे. राष्ट्राचे भविष्य केवळ तंत्रज्ञानाच्या प्रगतीत नसून सक्षम आणि जबाबदार नागरिक घडविण्यात आहे.

महिलांचे सक्षमीकरण हे संविधानिक समतेचे महत्त्वाचे प्रतीक आहे. महिलांनी शिक्षण, विज्ञान, प्रशासन, उद्योग, क्रीडा, संरक्षण आणि राजकारण या क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. तरीही महिलांवरील हिंसा, भेदभाव, असमान संधी आणि आर्थिक परावलंबित्व यांसारखे प्रश्न पूर्णपणे संपलेले नाहीत. स्त्रीला समान प्रतिष्ठा, समान संधी आणि सुरक्षित वातावरण मिळणे ही आधुनिक भारताची गरज आहे. घरापासून कार्यक्षेत्रापर्यंत समानतेची संस्कृती रुजविणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे.

ग्रामीण भारत आणि शेतकरी हे देशाच्या विकासाचे महत्त्वाचे आधारस्तंभ आहेत. शेती, ग्रामीण रोजगार,



जलसंधारण आणि स्थानिक अर्थव्यवस्थेच्या बळकटीकरणाशिवाय भारताचा सर्वांगीण विकास शक्य नाही. हवामान बदल, पाण्याची कमतरता, वाढता उत्पादन खर्च आणि बाजारातील अनिश्चितता यांसारखी आव्हाने शेतकऱ्यांसमोर आहेत. ग्रामीण भागात शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि तंत्रज्ञानाच्या समान संधी निर्माण करणे हे सामाजिक न्यायाचेच एक रूप आहे. विकासाची फळे समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचली तरच स्वातंत्र्याचा अर्थ अधिक व्यापक होईल.

पर्यावरणसंवर्धन हे आजच्या काळातील अत्यंत महत्त्वाचे नागरिक कर्तव्य आहे. पाणी, हवा, जंगल आणि जैवविविधता यांचे संरक्षण केवळ वर्तमानासाठी नव्हे तर भावी पिढ्यांसाठी आवश्यक आहे. पाण्याची बचत, वृक्षसंवर्धन, प्रदूषण नियंत्रण आणि सार्वजनिक परिसराची स्वच्छता यासाठी प्रत्येक नागरिकाने योगदान दिले पाहिजे. विकास आणि पर्यावरण यांच्यात संतुलन साधणे ही आजच्या राष्ट्रनिर्मितीची गरज आहे. निसर्गाचा ऱ्हास करून साधलेला विकास दीर्घकाळ टिकणारा ठरू शकत नाही.

आज भारत विज्ञान, तंत्रज्ञान, अंतराळ संशोधन, माहिती तंत्रज्ञान, औषधनिर्मिती आणि डिजिटल क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती करीत आहे. या प्रगतीचा लाभ समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. तंत्रज्ञानामुळे सुविधा वाढत असल्या तरी डिजिटल दरीही लक्षात घेतली पाहिजे. ग्रामीण आणि वंचित समाजघटकांना डिजिटल साधनांची उपलब्धता, माहिती आणि कौशल्ये मिळाली तर तंत्रज्ञान सामाजिक सक्षमीकरणाचे प्रभावी साधन बनू शकते.

देशभक्तीचा अर्थही आज नव्याने समजून घेण्याची गरज आहे. देशभक्ती म्हणजे केवळ राष्ट्रीय सणांच्या दिवशी तिरंग्याला सलाम करणे किंवा घोषवाक्ये देणे नव्हे. आपल्या कामात प्रामाणिक राहणे, कायद्याचे पालन करणे, सार्वजनिक संपत्तीचे संरक्षण करणे, पर्यावरण जपणे, गरजू व्यक्तीला मदत करणे आणि सामाजिक भेदभावाला विरोध करणे हीदेखील देशभक्तीचीच रूपे आहेत. सीमांचे रक्षण करणारा सैनिक जसा राष्ट्रसेवा करतो, त्याचप्रमाणे प्रामाणिकपणे काम करणारा शिक्षक, शेतकरी, वैज्ञानिक, डॉक्टर, कामगार आणि प्रत्येक जबाबदार नागरिक राष्ट्रनिर्मितीत योगदान देत असतो.

भारतीय स्वातंत्र्य आणि संविधानिक मूल्ये यांचा संबंध अतूट आहे. स्वातंत्र्यलढ्याने भारताला परकीय सत्तेपासून मुक्त केले, तर संविधानाने त्या स्वातंत्र्याला न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेची दिशा दिली. स्वातंत्र्याने आपल्याला स्वतःचे शासन करण्याचा अधिकार दिला; संविधानाने त्या शासनाची लोकशाही चौकट निश्चित केली. स्वातंत्र्याने राष्ट्रीय अस्मिता निर्माण केली; संविधानाने प्रत्येक नागरिकाच्या प्रतिष्ठेला समान स्थान दिले. म्हणूनच स्वातंत्र्यदिनाचा खरा उत्सव हा संविधानिक मूल्यांचा सन्मान आणि त्यांच्या आचरणातूनच पूर्ण होतो.

आज भारत स्वातंत्र्याच्या ऐंशीव्या वर्षात प्रवेश करीत असताना मागील प्रवासाचा अभिमान बाळगतानाच पुढील वाटचालीचे आत्मपरीक्षण करणे आवश्यक आहे. देशाने विज्ञान, तंत्रज्ञान, शेती, उद्योग, शिक्षण आणि लोकशाहीच्या क्षेत्रात मोठी प्रगती केली आहे. परंतु सामाजिक विषमता, बेरोजगारी, गरिबी, पर्यावरणीय संकट, शिक्षण आणि आरोग्यातील असमानता यांसारखी आव्हाने अद्याप आहेत. त्यामुळे आर्थिक प्रगतीसोबत सामाजिक न्याय, तंत्रज्ञानासोबत मानवी संवेदना आणि अधिकारांसोबत कर्तव्य यांचा समतोल साधणे आवश्यक आहे.

या स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने आपण ज्ञात-अज्ञात सर्व स्वातंत्र्यसैनिकांना विनम्र अभिवादन करूया. त्यांच्या त्यागाचे स्मरण करून संविधानिक मूल्ये आपल्या दैनंदिन जीवनात आचरणात आणण्याचा संकल्प करूया. न्यायासाठी उभे राहूया, स्वातंत्र्याचा जबाबदारीने वापर करूया, समानतेचा स्वीकार करूया आणि बंधुतेची भावना वाढवूया. जात, धर्म, भाषा, लिंग किंवा आर्थिक परिस्थितीच्या आधारावर भेदभाव न करता प्रत्येक व्यक्तीला सन्मान देऊया. लोकशाहीतील मतभेदांचा आदर करूया आणि संवादाची संस्कृती मजबूत करूया.

स्वातंत्र्य ही आपल्या पूर्वजांनी दिलेली अमूल्य देणगी आहे; परंतु ती पुढील पिढ्यांसाठी अधिक समृद्ध करून ठेवणे ही आपली जबाबदारी आहे. स्वातंत्र्यवीरांनी परकीय सत्तेच्या बेड्या तोडल्या; आज आपल्याला अज्ञान, विषमता, सामाजिक द्वेष, अंधश्रद्धा, भ्रष्टाचार आणि पर्यावरणाचा ऱ्हास यांसारख्या नव्या आव्हानांवर मात करायची आहे. ही लढाई शस्त्रांची नसून ज्ञानाची, विवेकाची, प्रामाणिकपणाची आणि सामाजिक बांधिलकीची आहे.

तिरंगा जेव्हा आकाशात डौलाने फडकतो, तेव्हा त्याच्याकडे पाहताना आपल्या मनात केवळ राष्ट्राभिमान नव्हे, तर राष्ट्रीय कर्तव्याची जाणीवही निर्माण झाली पाहिजे. त्या तिरंग्यात स्वातंत्र्यवीरांचा त्याग, संविधाननिर्मात्यांची दूरदृष्टी आणि कोट्यवधी भारतीयांच्या भविष्याची स्वप्ने सामावलेली आहेत. त्या स्वप्नांना साकार करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने आपली भूमिका प्रामाणिकपणे पार पाडणे आवश्यक आहे.

म्हणूनच या स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने आपण असा भारत घडविण्याचा संकल्प करूया, जिथे प्रत्येक मुलाला शिक्षणाची संधी मिळेल, प्रत्येक युवकाला सन्मानजनक रोजगाराची संधी मिळेल, प्रत्येक महिलेला समानता आणि सुरक्षितता मिळेल, प्रत्येक शेतकऱ्याला सन्मानाने जगता येईल, प्रत्येक दिव्यांग व्यक्तीला समान संधी मिळेल आणि कोणत्याही व्यक्तीला जात, धर्म, भाषा किंवा आर्थिक परिस्थितीमुळे अन्याय सहन करावा लागणार नाही. असा भारत निर्माण करणे हीच संविधानिक मूल्यांची खरी अंमलबजावणी ठरेल.

भारतीय स्वातंत्र्य ही केवळ भूतकाळातील ऐतिहासिक घटना नाही; ती वर्तमानातील जबाबदारी आणि भविष्याची आशा आहे. संविधान हे केवळ कायद्याचे पुस्तक नसून भारतीय लोकशाहीचे नैतिक अधिष्ठान आहे. स्वातंत्र्य आणि संविधानिक मूल्यांचा संगमच भारताच्या राष्ट्रजीवनाला अर्थ देतो. म्हणून स्वातंत्र्यदिन साजरा करताना संविधानाचा सन्मान, लोकशाहीवरील विश्वास, सामाजिक समतेची बांधिलकी आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना आपल्या मनात दृढ करूया.

स्वातंत्र्य मिळविणे हा आपल्या पूर्वजांचा महान पराक्रम होता; परंतु त्या स्वातंत्र्याला न्याय, समता, बंधुता आणि मानवी प्रतिष्ठेने समृद्ध करणे ही आपल्या पिढीची ऐतिहासिक जबाबदारी आहे. आपल्या प्रत्येक जबाबदार कृतीतून संविधानिक मूल्यांना बळ मिळाले, तर स्वातंत्र्यवीरांच्या बलिदानाला खरी आदरांजली मिळेल. तिरंगा सदैव उंच फडकत राहो, भारतीय लोकशाही अधिक बळकट होत राहो, संविधानिक मूल्यांचा प्रकाश समाजाच्या प्रत्येक स्तरापर्यंत पोहोचो आणि भारत अधिक समतामूलक, न्याय्य, सक्षम व मानवी राष्ट्र म्हणून जगासमोर उभा राहो, हीच स्वातंत्र्यदिनाच्या पवित्र प्रसंगी मनःपूर्वक शुभेच्छा.

**■ डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

---

# वरिष्ठ पोलीस निरीक्षक अविनाश आघाव यांना 'अति उत्कृष्ट सेवा पदक'

## ३१ वर्षांच्या निष्कलंक सेवेसह गुन्हे तपास, दहशतवादविरोधी कारवाई आणि कायदा-सुव्यवस्थेतील उल्लेखनीय कामगिरी

■ छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर शहर पोलीस दलातील वरिष्ठ पोलीस निरीक्षक अविनाश लक्ष्मीनारायण आघाव यांची प्रदीर्घ, निष्कलंक आणि उल्लेखनीय पोलीस सेवेची दखल घेत 'अति उत्कृष्ट सेवा पदका'साठी निवड करण्यात आली आहे. राज्य पोलीस दलाच्या उत्कृष्ट सेवा पदकाच्या यादीत त्यांचा समावेश असून, सध्या ते विशेष शाखेत वरिष्ठ पोलीस निरीक्षक म्हणून कार्यरत आहेत.

१९९५ मध्ये पोलीस उपनिरीक्षक म्हणून सेवेत दाखल झालेल्या आघाव यांनी ३१ वर्षांची सेवा पूर्ण केली आहे. सेवाकाळात त्यांना तब्बल १,९४१ बक्षीस व ११६ प्रशस्तीपत्रे मिळाली ,त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना २०१८ मध्ये गुणवत्तापूर्ण सेवेकरिता राष्ट्रपती पोलीस पदक, २०१९ मध्ये केंद्रीय गृहमंत्र्यांचे 'Medal for Excellence in Investigation' तसेच "पोलीस महासंचालकांचे "उत्कृष्ट सेवेबद्दलचे सन्मानचिन्ह मिळाले आहे.



महाराष्ट्रातील "उत्कृष्ट तपास अधिकाऱ्याचा पुरस्कारही"त्यांना दोन वेळा प्राप्त झाला आहे. गुन्हे तपासात आघाव यांनी खंडणीखोर टोळीचा पर्दाफाश, संवेदनशील खून प्रकरणे, नागपूर विद्यापीठातील परीक्षा गैरव्यवहार, भूमाफिया, विमा फसवणूक, गुंतवणूक घोटाळे आणि परीक्षा पेपरफुटी यांसारख्या महत्त्वाच्या प्रकरणांत उल्लेखनीय कामगिरी केली. विविध गंभीर गुन्ह्यांच्या तपासातून १,२६९ हून अधिक आरोपींना अटक करण्यात आली.

दहशतवादविरोधी पथकात कार्यरत असताना नालासोपारा शस्त्रसाठा तसेच ISISशी संबंधित प्रकरणांच्या तपासातही त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. २०१८, २०१९ आणि २०२३ मधील छत्रपती संभाजीनगर मधील सांप्रदायिक तणावाच्या काळात जखमी होऊनही त्यांनी कर्तव्य बजावले.

### विशेष म्हणजे, 31 वर्षांचे सेवेत

सतत 26 वर्षे'Outstanding (A+)' व 5 वर्षे Very Good अशी नोंदविण्यात आली आहे. अविनाश आघाव यांच्या ३१ वर्षांच्या समर्पित सेवेला 'अति उत्कृष्ट सेवा पदक' ही मानाची पावती ठरली आहे.

---



# पर्यावरण संरक्षण, संवर्धन संदेश देत निघाली तिरंगा ई-बाईक रॅली!

**■ बीड प्रतिनिधी**

८० व्या स्वातंत्र्यदिना प्रित्यर्थ आज जिल्हा प्रशासनातर्फे आज शहरातील प्रमुख मार्गांवरुन तिरंगा ई-बाईक रॅली काढण्यात आली. हरित भविष्यासाठी एक पाऊल या संदेशासह काढण्यात आलेल्या रॅलीला जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून याचा प्रारंभ करण्यात आला.

पर्यावरण जपण्यासाठी प्रदुषण कमी होणे आवश्यक आहे. वाहनातील इंधनामुळे होणारे वायू प्रदुषण रोखण्यात ई-बाईक वापरास सुरुवात केल्यास पर्यावरणाची हानी रोखण्यास मदत होईल असा संदेश या तिरंगा रॅलीद्वारे देण्यात आला.

छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथून रॅलीला सुरुवात झाली. यावेळी अपर जिल्हाधिकारी हरिष धार्मिक, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी सुरेश आव्हाड, उपजिल्हाधिकारी शैलेश सुर्यवंशी, सहायक परिवहन अधिकारी बालाजी धनवे, जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, नायब तहसीलदार सुहास हजारे आदींसह पोलिस दलाचे अधिकारी उपस्थित होते.

तिरंगा ई बाईक रॅली छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथून वसंतगंज चौक, बळवंतभाई चौक, मळीवेस चौक ते अण्णाभाऊ चौक मार्ग पुन्हा क्रीडांगण या मार्गावर नेण्यात आली. शहरातील विविध नागरिकांचा यात उत्स्फूर्त सहभाग होता. काही जणांनी सायकलसह यात सहभाग नोंदविला.रॅलीत सहभागी झालेल्या सर्वांना प्रशासनातर्फे यावेळी प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आले.

दैनिक
अतुल्य महाराष्ट्र
• बीड, शनिवार, 15 ऑगस्ट 2026

# परळीच्या विकासाला मिळणार 'पशुवैद्यकीय' बळ!

## पंकजाताईंच्या दूरदृष्टीतून साकारतेय महाविद्यालयाची स्वप्नपूर्ती; भूमिपूजन सोहळ्यास हजारोंनी उपस्थित राहा – राजेश गित्ते



**परळी / प्रतिनिधी**

ज्या विकासाचे स्वप्न परळीकरांनी पाहिले, त्याला आज प्रत्यक्ष आकार मिळणार आहे! परळीत साकारत असलेल्या बहुप्रतिक्षित पशुवैद्यकीय महाविद्यालयाचा कोनशिला समारंभ व भूमिपूजन सोहळा आज शनिवार, दि. १५ ऑगस्ट रोजी दुपारी 2 वाजता उत्साहात होत आहे. राज्याच्या उपमुख्यमंत्री ना. सुनेत्राताई पवार यांच्या हस्ते आणि पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे, यांच्या अध्यक्षतेखाली व विविध मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. परळीच्या विकासाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंद होणाऱ्या या क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी शेतकरी, पशुपालक, विद्यार्थी, युवक व शिक्षणप्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन भाजपा तालुकाध्यक्ष राजेश गित्ते यांनी केले आहे.

परळीत पशुवैद्यकीय महाविद्यालय यावे, ही केवळ मागणी नव्हती; तर ग्रामीण विद्यार्थ्यांच्या भवितव्याला नवी दिशा देण्याचे स्वप्न होते. हे स्वप्न साकारण्यासाठी पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या दूरदृष्टी, विकासाची तळमळ आणि अथक प्रयत्नांमुळे परळीसारख्या तालुक्याच्या ठिकाणी एवढ्या मोठ्या शैक्षणिक संस्थेची मुहूर्तमेढ रोवली जात आहे.

'तालुक्याच्या ठिकाणी काय होऊ शकते?' याचे उत्तर पंकजाताई मुंडे यांच्या कामातून परळीला मिळाले आहे. पशुवैद्यकीय महाविद्यालय हा केवळ एक प्रकल्प नसून परळीच्या भावी पिढीच्या स्वप्नांना बळ देणारी मोठी संधी आहे.



### परळीच्या शैक्षणिक नकाशावर उमटणार नवे नाव!

पशुवैद्यकीय महाविद्यालयामुळे परळीच्या शैक्षणिक क्षेत्राला मोठी चालना मिळणार आहे. जिल्ह्याबाहेरील विद्यार्थीही शिक्षणासाठी परळीत येतील. त्यामुळे विद्यार्थ्यांसाठी नव्या संधी निर्माण होण्यासोबतच शहरातील निवास, भोजन, वाहतूक, व्यापार आणि विविध व्यवसायांना मोठी चालना मिळणार आहे.

म्हणजेच महाविद्यालयाच्या रूपाने परळीत शिक्षणाची दारे उघडणार आणि त्याचबरोबर स्थानिक अर्थव्यवस्थेलाही नवे बळ मिळणार आहे.

### शेतकरी-पशुपालकांसाठीही ठरणार वरदान

परळी तालुका हा कृषी आणि पशुधनाच्या दृष्टीने महत्त्वाचा भाग आहे. पशुवैद्यकीय महाविद्यालयामुळे परिसरातील शेतकरी व पशुपालकांना पशुसंवर्धन, आधुनिक उपचारपद्धती, संशोधन आणि तज्ज्ञ मार्गदर्शनाचा मोठा फायदा होणार आहे. त्यामुळे या महाविद्यालयाचा लाभ केवळ विद्यार्थ्यांपुरता मर्यादित न राहता ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही मिळणार आहे.

### आज परळीकरांनी दाखवायची एकजूट!

आजचा भूमिपूजन सोहळा म्हणजे केवळ महाविद्यालयाच्या इमारतीची पायाभरणी नाही; तर परळीच्या उज्ज्वल भवितव्याची पायाभरणी आहे. पंकजाताई मुंडे यांच्या प्रयत्नांतून परळीला मिळालेल्या या महत्त्वपूर्ण प्रकल्पाचे स्वागत करण्यासाठी शहर व



तालुक्यातील नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे.

विकासाच्या या ऐतिहासिक पर्वात आपली उपस्थिती नोंदवूया आणि परळीच्या शैक्षणिक भरारीचा साक्षीदार होऊया! आज होणाऱ्या या भूमिपूजन सोहळ्यास शेतकरी, पशुपालक, विद्यार्थी, युवक, व्यापारी, शिक्षणप्रेमी नागरिक तसेच सर्वसामान्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन भाजपा तालुकाध्यक्ष राजेश गित्ते यांनी केले आहे.

# 41 हेक्टर क्षेत्रात उभे राहणार भव्य संकुल! जिल्हा मध्यवर्ती बँकेस मदतीसाठी कॅबिनेट समोर प्रस्ताव सादर करणार

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार



**बीड |** बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला मदत करण्यासाठी कॅबिनेट समोर प्रस्ताव आणला जाईल, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी केले. याबाबत अवसायक, प्रशासक आणि एम.सी.सी. बँकेने त्वरीत कार्यवाही करावी असे निर्देश त्यांना आज बँकेच्या आढावा बैठकीत दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन सभागृहात बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीस आमदार धनंजय मुंडे, आमदार विजयसिंह पंडित, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान, पोलिस अधिक्षक नवनीत काँवत, प्रशिक्षणार्थी जिल्हाधिकारी दिव्यांक गुप्ता, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांची प्रमुख उपस्थिती होती.

बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी राज्य सहकारी बँकेने आपला व्याजदर कमी करून बीड जिल्हा बँकेला 5 ते 7 टक्के व्याजदराने कर्ज उपलब्ध करून द्यावे, यासाठी उपमुख्यमंत्र्यांनी बैठकीतूनच थेट भ्रमणध्वनीद्वारे संवाद साधत हा प्रश्न तात्काळ मार्गी लावण्याचा प्रयत्न केला. जिल्ह्यातील चालू हंगामातील पीक कर्ज वाटपाची स्थिती आणि शेतकरी कर्जमाफी योजनेच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यात आला. राज्य बँकेकडे अडकलेले बँकेचे विविध प्रस्ताव आणि शासनाकडून मिळणारा प्रलंबित व्याज परतावा लवकरात लवकर वर्ग करण्याबाबत सकारात्मक पावले उचलण्याचे निर्देशही बैठकीत देण्यात आले. तसेच बँकेच्या कृषी आणि अकृषीक कर्जदारांची सद्यस्थिती जाणून घेत बँकेची आर्थिक स्थिती कशी सुधारता येईल यावर सकारात्मक चर्चा झाली. याबैठकीस संबंधित अधिकारी उपस्थित होते.

# उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते आज होणार मुख्य शासकीय ध्वजारोहण

**बीड |** 80 व्या भारतीय स्वातंत्र्य दिनाचा बीड जिल्ह्याचा मुख्य शासकीय ध्वजारोहण सोहळा उद्या शनिवार दि. 15 ऑगस्ट रोजी राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते होणार आहे.

बीड येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात हा मुख्य ध्वजारोहण सोहळा सकाळी 9.05 वाजता होईल. या कार्यक्रमास उपस्थित राहणे नागरिकांना शक्य व्हावे, यासाठी सकाळी 8.35 ते 9.35 दरम्यान कोणताही शासकीय व निमशासकीय कार्यक्रम आयोजित करण्यात येऊ नये, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

या कार्यक्रमास अधिकाधिक नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले आहे.

प्रशासकीय भवन बीड येथील मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीमधील ध्वजारोहण सोहळा अप्पर जिल्हाधिकारी हरिष धार्मिक यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमास नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.



# श्रीक्षेत्र वाहिरा येथे संत शेख महंमद महाराज जन्मोत्सव उत्साहात

**प्रतिनिधी | सोपान पगारे**

तालुक्यातील श्रीक्षेत्र वाहिरा येथे संत शिरोमणी शेख महंमद महाराज यांचा जन्मोत्सव विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांनी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

जन्मोत्सवानिमित्त सकाळी ७ वाजता संत शेख महंमद महाराजांच्या समाधी मंदिरात महाआरती करण्यात आली. त्यानंतर टाळ-मृदुंगाच्या गजरात व हरिनामाचा जयघोष करत ग्रामप्रदक्षिणा काढण्यात आली. ग्रामप्रदक्षिणेत भाविक, वारकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

यानंतर संत शिरोमणी शेख महंमद महाराज प्रतिष्ठानचे अध्यक्ष ह.भ.प. सिद्धीनाथ मेटे महाराज यांचे भक्तिमय कीर्तन झाले. आपल्या कीर्तनातून त्यांनी संत शेख महंमद महाराजांचे विचार, भक्ती, समाजप्रबोधन आणि मानवतेचा संदेश उपस्थितांसमोर मांडला.

जन्मोत्सवाचे औचित्य साधून गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव व सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून प्रगती साधत समाज व गावाचे नाव उज्ज्वल करावे, असा संदेश यावेळी देण्यात आला. समाधान महाराज नाडकर, सुभाष महाराज थोरवे, सोपान पगारे, रेवन्नाथ मेटे, शेषराव आटोळे यांनी कीर्तन साथ केली.

या वेळी कडा सहकारी साखर कारखाना संचालक पांडुरंग गावडे, प्रतिष्ठानचे सचिव ह.भ.प. किसन आटोळे सर, आदेश महाराज, पोलीस पाटील सुहास झांजे, उपसरपंच भाऊसाहेब झांजे, योगेश झांजे, गंगाधर आटोळे, सीताराम झांजे, अंकुश झांजे, विजय महाराज घोंगडे, पोपट मेटे, गणेश महाराज माळशिखरे, राजू घोंगडे, सुखदेव महाराज झांजे, मंगेश जेधे , राम शेलार वारकरी, भाविक, ग्रामस्थ, शिक्षक, विद्यार्थी,



पालक तसेच पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोमनाथ शेलार सर यांनी केले तर आभार सदाशिव पगारे सर यांनी मानले.

### या विद्यार्थ्यांचा गुणगौरव...

यश दादासाहेब झांजे, अक्षय संतोष झांजे, ओम गणेश झांजे, आरव विशाल बोन्द्रे, संस्कार बाळासाहेब खोमणे, सिद्धांत सागर वागस्कर, आराध्य विजयकुमार माळशिकारे, शिवांजली बाळासाहेब गावडे, साक्षी संतोष पांडुळे, प्रांजल जगदीश आटोळे, शुभांगी सुधीर पवार, जयदीप श्रीकृष्ण बोन्द्रे, ओम सुनील माळशिकारे, अंजली संतोष झांजे, ओंकार दादासाहेब झांजे, वैष्णवी बिभीषण झांजे

# उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, ना.पंकजाताई मुंडे आज परळीत; नवीन पशुवैद्यकीय महाविद्यालयाच्या इमारतीचे भूमीपूजन

## ना.पंकजाताईंच्या दूरदृष्टीने परळीत उभे राहणार पशुसंवर्धनाचे 'पॉवर सेंटर'!

महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर अंतर्गत परळी वैजनाथ येथे उभारण्यात येत असलेल्या पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालयाच्या इमारतीचा कोनशिला समारंभ व भूमिपूजन सोहळा उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्राताई पवार यांच्या हस्ते व राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना पंकजाताई मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली उद्या स्वातंत्र्यदिनी दुपारी २ वाजता मोठ्या थाटात संपन्न होत आहे.

ग्रामीण पोलीस स्टेशनच्या बाजूला, नंदागोळ रोड, येथे हा सोहळा होणार आहे. या सोहळ्यास खा. बजरंग सोनवणे, आ. धनंजय मुंडे, आ. सतीश चव्हाण, आ. बसवराज पाटील, आ. डॉ. परिणय फुके, आ. विक्रम काळे, आ. प्रकाश सोळंके, आ. सुरेश धस, आ.नमिता मुंदडा, आ. संदीप क्षीरसागर, आ. विजयसिंह पंडित, आ. चैनसुख संचेती, आ. राजकुमार बडोले, आ. संजय मेश्राम, नगराध्यक्षा पद्मश्री धर्माधिकारी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

यासिवाय कार्यक्रमास मपमविवि, नागपूरचे कुलगुरू डॉ. नितीन पाटील, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव डॉ.



रामास्वामी एन., छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त जी. श्रीकांत , आयुक्त पशुसंवर्धन डॉ. किरण पाटील, बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन , तसेच मपमविवि, नागपूरचे कार्यकारी परिषद सदस्य इंजि. गोविंद बापूराव नरवडे यांची विशेष उपस्थिती राहणार आहे.परळीच्या शैक्षणिक, पशुसंवर्धन व कृषीपूरक क्षेत्राच्या विकासाला या महाविद्यालयामुळे नवी दिशा मिळणार आहे. या सोहळ्याला मोठ्या संख्येने



उपस्थित राहावे असे आवाहन संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (पशुविज्ञान शाखा), मपमविवि, नागपूर डॉ. क्षितिज उपाध्ये, विद्यापीठ अभियंता प्रमोदकुमार तायडे आणि पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, परळी वैजनाथचे प्रकल्प अधिकारी डॉ. प्राणेश येवतीकर यांनी आवाहन केले आहे

### ना.पंकजाताईंची दूरदृष्टी

पशुवैद्यकीय महाविद्यालय हे केवळ अध्यापनापुरते मर्यादित न राहता पशुवैद्यकीय सेवा, प्राणी रुग्णालय, संशोधन, निदान सेवा तसेच पशुपालकांसाठी प्रशिक्षणाच्या दृष्टीने महत्त्वाचे केंद्र ठरणार आहे. या प्रकल्पामुळे परळी व परिसरातील विद्यार्थ्यांना पशुवैद्यकीय शिक्षणाच्या नव्या संधी उपलब्ध होण्याबरोबरच पशुपालकांनाही आधुनिक पशुवैद्यकीय सुविधा मिळण्यास मोठी मदत होणार आहे.पंकजाताई मुंडे यांच्या दूरदृष्टीतून परळीच्या भूमीत उभे राहणारे हे पशुवैद्यकीय संकुल भविष्यात हजारो पशुपालकांना सेवा, शेकडो विद्यार्थ्यांना शिक्षण आणि पशुसंवर्धन क्षेत्राला तज्ज्ञ मनुष्यबळ देणारे केंद्र ठरणार आहे. या निमित्ताने आज परळीच्या मातीत एक नवे स्वप्न आकार घेत आहे.शेतकरी, पशुपालक, विद्यार्थी आणि संपूर्ण पशुसंवर्धन क्षेत्राच्या भविष्यात बदल घडविणारी मोठी पायाभूत गुंतवणूक ठरणार आहे.५६४ कोटींच्या या प्रकल्पाची भूमिपूजनाची ही कोनशिला परळीच्या विकासातील नवी झेप ठरणार आहे. या ऐतिहासिक सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.